# बोदवडच्या तेजस चौधरींस अखिल भारतीय धनुर्विद्यास्पर्धेचे रजत पदक

(18.01.2020) कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय बोदवडचा धनुर्विद्या खेळाडू तेजस चौधरी यांस अखिल भारतीय आतर विद्यापीठ स्पर्धेत रजत पदक प्राप्त झाले आहे

बैगळुरू केंद्रीय विद्यापीठाद्वारे शेषयाद्रीपुरंम महाविद्यालयात दि.16 ते 18 जानेवारी 2020 दरम्यान या स्पर्धा झाल्या तेजस चौधरीने याच वर्षी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव अंतर्गत स्पर्धेत प्रथम क्रमांक प्राप्त झाला होता व अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ संघात निवड झाली होती तेजस चौधरी यास डॉ.किशोर पाठक यांचे मार्गदर्शन लाभले, महाविद्यालयाच्या ऐतिहासिक यशाबाबत संस्थेचे चेअरमन श्री.मिठुलालजी अग्रवाल,उपाध्यक्ष अजयजी जैन, सचिव विकासजी कोटेचा व संचालक मंडळ तसेच प्राचार्य अरविद चौधरी उपप्राचार्य डी एस पाटील व सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



